**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**परिपत्रक**

शिवजयंती निमित्त रविवार दिनांक. 19 फेब्रुवारी, 2023 रोजी सकाळी 8.30 वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते व मा. प्र–कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण व ध्वजारोहण असा संयुक्त समारंभ संपन्न होणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनींनी शासन निर्देशानुसार या समारंभास उपस्थित रहावे. ही विनंती.

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/ 1284
दिनांक : 9/02/2023

संचालक
विद्यार्थी विकास

प्रति,

१. सर्व शिवाजी विद्यापीठ परिसरातील अधिविभागप्रमुखांनी आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी/विद्यार्थीनींना व प्रशासकीय सेवक यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
2. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
3. मा. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी संचालक, विद्यार्थी विकास यांच्याशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्यावेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत गायनाची व्यवस्था करावी.
4. वाहन विभागप्रमुख यांनी मा. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक/कलाकार व वाद्ये आणण्यासाठी वाहनाची सोय करावी.
5. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी ध्वजवंदन कार्यक्रम यासाठी ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
6. आभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी. तसेच ध्वजस्तंभाची स्वच्छता व वरील कप्पीची ठाकठीकता पहावी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयाची देखभाल पहावी.
7. उद्यान विभागप्रमुखांनी ध्वजारोहण परिसरातील बागेची ठाकठिकता पहावी. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयास व लहान पुतळयास असे दोन पुष्पहार आणावेत.
8. आभियांत्रिकी विभाग यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याची व्यवस्था करावी व लहान पुष्पहार ध्वजारोहण कार्यक्रमापूर्वी मा. कुलगुरू यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास अर्पण केला जाईल. याची नोंद घ्यावी.
9. नोटीस बोर्डवर लावणेसाठी
   - १) मुलींचे वसतिगृह क्र.१,२ व ३
   - २) मुलांचे वसतिगृह क्र.१,२ व ३
   - ३) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन
   - ४) बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय.
   - ५) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीनी भवन
   - ६) तंत्रज्ञान विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह
10. श्री. डी. आर. चौगुले, जमादार यांनी आस्थापना विभागाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार चार शिपाई या विभागाच्या मदतीस देण्याचे आहेत. त्याची पूर्व सूचना दिनांक. 17 फेब्रुवारी, 2023 रोजी सर्व संबधीतांना त्यांनी द्यावी.
11. सुरक्षा अधिकारी यांनी परेडसाठी स्कॉड तयार करावे व ध्वजारोहणप्रसंगी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करावी.